निर्भीड जॅक



निर्भीड जॅक

मराठी : अश्विनी बर्वे




निर्भीड जॅक

मराठी : अश्विनी बर्वे








गोष्ट त्या दिवसांची आहे, जेव्हा राक्षस आणि यूनिकॉर्न आणि असेच इतर भयंकर प्राणी लोकांना भयभीत करत असत. तेव्हा एके ठिकाणी एक वृद्ध महिला आणि तिचा मुलगा जॅक राहत होते.

जॅकला दोन मोठे भाऊ सुद्धा होते पण ते धन कमवण्यासाठी घरापासून दूर निघून गेले होते. आईची काळजी घेण्यासाठी घरात फक्त जॅक होता. पण एक वेळ अशी आली की त्यांच्याकडे एक भांडं आणि एक पैसाच फक्त उरला. तेव्हा आई म्हणाली, “जॅक आपण भुकेने मरण्याच्या आधी तुला एखादं काम शोधायला हवं.” जॅकच्या आईने त्याला घरात उरलेलं एक शेवटचं बिस्कीट आणि एक सॅन्डविचबांधून दिलं आणि त्याला कामाच्या शोधात पाठवून दिलं.

जॅक काही डोंगर चढला आणि काही डोंगर उतरला आणि मग त्याला खूप भूक लागली. बिस्कीट आणि सैंडविच खाण्यासाठी तो एका दगडावर बसला..

लवकरच एक मधमाशी त्याच्या बिस्किटावर फिरू लागली.मग अजून एक आली. “इथं पिकनिकसाठी तुम्हांला कोणी बोलावलं?” जॅक ओरडून म्हणाला. आणि मधमाश्यांना हाकलण्यासाठी त्याने आपला हात इकडेतिकडे हलवला. पण त्यांना काही फरक पडला नाही. त्याला काही समजण्याच्या आधीच मधमाशांची झुंड त्याच्या सैंडविचवर भणभणू लागल्या.

जॅक खूप रागावला, खूपच चिडला. त्याने आपली टोपी काढली आणि जोरात मधमाश्यांना मारली.
फटाक!



सैंडविचवर मेलेल्या मधमाशांना जॅक काढू लागला, “एक, दोन, तीन, चार ...” जॅकने दहापर्यंत मोजले. “वाईट नाही हे, एका झटक्यात दहा.”

एका घमेंडी कोंबड्या सारखी त्याने आपली छाती फुगवली. “एका झटक्यात दहा!”

त्याने एक छोटी काठी सोलून घेतली आणि त्याचे टोक निळ्या बोरांच्या रसात बुडवून आपल्या टोपीवर लिहले, निर्भीड जॅक ज्याने एका झटक्यात दहा जणांना मारले. मग त्याने आपले सैंडविच खाल्ले आणि आपल्या रस्त्याने गेला.



काही वेळानंतर तो एका नगरात पोहचला. ते शहर अगदी सुनसान दिसत होतं, कोणीच रस्त्यावर फिरत नव्हतं आणि सगळीकडे शांतात होती.

मग अचानक वाऱ्याच्या वेगाने एक प्राणी त्याच्याकडे पळत आला.



आपला जीव वाचवण्यासाठी जॅक एका बाजूला झाला.पण तोपर्यंत त्याच्या नाकपुड्यांपर्यंत एक दुर्गंध पोहचला होता.



“ही काय पिडा आहे?” त्या प्राण्याला शहराच्या मध्ये फुत्कारत जातांना पाहिलं तेव्हा जॅक म्हणाला.

काही मिनिटांनंतर एका माणसाने घराचा दरवाजा उघडून बाहेर पाहिलं. “तू अजूनही श्वास घेत आहेस, पोरा?”

“हो, नक्कीच,” जॅक आपल्या कपड्यांची धूळ झटकत म्हणाला.

त्या माणसाने आपलं डोकं थोडंसं बाहेर काढलं आणि डावी उजवीकडे बघितलं. शेवटी तो बाहेर आला.

“मी या शहराचा शेरीफ आहे, तू कोण आहेस?”

“माझं नाव जॅक आहे.”



शेरिफने त्याच्याकडे वरून खाली आणि खालून वर पाहिलं. जॅकच्या टोपीवर. “यावर लिहलं आहे की तू एका फटक्यात दहा मारले.”

“हो”

“हं. तू ताकदवान तर वाटत नाही.तुला विश्वास आहे की तूच दहा जणांना मारले. सगळे एकाच फटक्यात.?”

“हो, मीच मारलं.”अर्थात जॅकने हे सांगितलं नाही की ते दहा कोण होते.


“ठीक आहे पोरा, जर तू खरं सांगत आहेस तर मला काही शंका नाही.तू अगदी बरोबर जागेवर आला आहेस. इथं काही जंगली जनावरं त्रास देत आहे. सगळ्यांना घाबरून सोडलं आहे या प्राण्यांनी पक्षी सुद्धा यायला घाबरतात.पीक बरबाद करत आहेत. लोक घराच्या बाहेर यायला घाबरत आहेत. खरं तर या धूर्त प्राण्यांना पकडण्यासाठी पुरस्काराची घोषणा केली आहे. पं मी तुला सावध करू इच्छितो. तुझ्यासारखे कितीतरी मोठमोठे प्रयत्न करून गेले. पण त्यांच्यातले कोणीच इथं दिसत नाही.” शेरिफ कपटीपणे हसून म्हणाला, “पण मला वाटतं ज्याने एका फटक्यात दहा मारले तो या थोड्याशा जंगली जानवरांना नक्कीच निपटू शकतो.”



जॅक थोड्यावेळ विचार करत राहिला. मग म्हणाला, “पुरस्कार काय आहे?”

“रोख शंभर डॉलर.”

जॅकला वाटलं की त्याच्यासाठी आणि आईसाठी शंभर डॉलर पुरेसे होतील. पण मधमाश्या आणी जंगली जानवर यांच्यातला फरक त्याला कळत होता. म्हणून जॅक म्हणाला, “मी बघतो मी काय करू शकतो ते.”



जॅक आपल्या रस्त्याने निघाला. त्याने विचार केला की, एक जंगली जानवराची शिकार करणे मोठं जोखमीचे काम आहे. त्याने ठरवलं की इथून गुपचूप निघून दुसऱ्या शहरात निघून जावं आणि तिथं एखादं सामन्य काम शोधावं. मग त्या कामाचे जास्त पैसे मिळाले नाही तरी चालतील. पण तो सुरक्षित राहील.

जॅक शहराच्या बाहेर जाणारच तेवढ्यात त्याने फुफ्कार आणि घरघर आवाज ऐकला. त्याने चारी बाजूला बघितलं आणि त्याला इतकं मोठं आणि भयानक डुक्कर दिसलं की तसे त्याने आजपर्यंत कधीही बघितले नव्हतं.

“ऊऊउईईई.” जॅक ओरडला आणि पळाला. ते भयंकर डुक्कर त्याच्यामागे एवढ्या वेगाने धावले की त्याने जवळजवळ जॅकला पकडलंच.



भाग्याने जॅकला साथ दिली, त्याला मका ठेवण्याचे कोठार दिसले.तो सरळ त्याकडे धावला. तो आत गेला आणि त्याच्या मागच्या भिंतीवर चढला. जंगली डुक्कर त्याच्यामागेच होतं. पण ते भिंतीवर चढू शकत नव्हतं. ते भिंतीजवळ उभं राहून ओरडत राहिलं आणि जॅकला पकडण्याचा प्रयत्न करू लागलं.



जॅक मागची भिंत उतरून खाली आला आणि कोठाराच्या बाहेर पडला. तो पळत दरवाज्याच्या बाहेर आला आणि त्याने पटकन जोरात दार बंद केलं. आणि दरवाज्याला एक ओंडका अशा पद्धतीने लावला की दार उघडू शकणार नाही.जेव्हा डुक्कराला कळलं की काय झालं आहे, तेव्हा डुक्कर रागाने वेडं झालं. त्याने दरवाज्याला जोरजोरात धक्के मारले पण दरवाजा उघडला नाही.

जॅक शहरात परत आला. तो भास मारत चालत होता आणि शिट्टी वाजवत होता.

“तुला एखादा जंगली प्राणी दिसला का?” शेरिफने विचारले.

“मला तर एक भयंकर डुक्कर नाही दिसले पण एक छोटं डुक्कर दिसलं,” जॅक म्हणाला. “छोटंसं डुक्कर,प्रेमळ. पण ते तर मला त्रास देत होते.म्हणून मी त्याला मक्याच्या गोदामात बंद करून ठेवलं. तुम्ही जावून बघा, कदाचित ते एखाद्या जंगली जानवरापैकी असेल.”

जेव्हा शेरिफने डुक्कराला त्या बंद गोदामात बघितलं तेव्हा तो बघतच राहिला. “अरे निर्भीड जॅक, मी तुझ्याबाबत चुकीचा विचार केला होता.मला वाटलं नाही की, तू एवढा मोठा शिकारी असशील, तू एवढा लहान आहे ना.”




जॅकने आपले शंभर डॉलर घेतले आणि तिथून निघाला.

"एक मिनट थांब," शेरिफ म्हणाला. "जर तू त्या सैतानी भुऱ्या अस्वलाला, जे आमच्या शेताची नासधूस करत, त्यापासून आम्हाला सोडवलं तर मी तुला अजून शंभर डॉलर देईन."

"ठीक आहे, मी बघतो मला काय करता येतं ते," जॅक म्हणाला. पण त्याला सरळ जाण्याची इच्छा होती. "मला कोणत्याही सैतानी अस्वलाच्या भानगडीत पडण्याची इच्छा नाही," जॅकने स्वतःशी बोलला. "ते मला रगडून टाकेल. त्यापेक्षा मी हे शंभर डॉलर मध्ये माझी आई आणि मी हिवाळा मस्त काढू." जॅकला उगाच मेहनत करायला अजिबात आवडत नसे.

जॅक शहरातून निघाला.तो शहराच्या बाहेर थोडा लांब गेला नाही तर त्याला झोप येवू लागली. त्याने रस्त्याच्या कडेला एक मोठी टेकडी बघितली, तिथली जमीनीवर थोडंस गवत होतं. "मला थोड्या वेळ झोपायला हवं". जॅक म्हणाला आणि तो त्या टेकडीवर चढून झोपी गेला.



जॅकने भयंकर स्वप्न बघितले. स्वप्नात त्याने एक अस्वल बघितले जे पहाडासारखे मोठे, सैताना सारखे निर्दयी आणि बकरी सारखे भुकेले होते. आणि जॅक त्याच्या पाठीवर होता.

पण हे स्वप्न नव्हते. जेव्हा जॅक पूर्णपणे जागा झाला तेव्हा त्याने पाहिलं की तो खरंच एका अस्वलाच्या पाठीवर होता. कार्निवलच्या झोक्यासारखे अस्वल मागे जात होते. ते ओरडत होते आणि जॅकला पकडण्यासाठी डाव्या-उजव्या बाजूला हात फिरवत होते.





शेवटी जॅकला औदुंबराच्या झाडाला दाबून टाकण्याच्या इराद्याने ते अस्वल मागच्या बाजूला जाऊ लागलं. देवाचे आभारच की अस्वलाला डोक्याच्या मागचे दिसत नाही. म्हणून त्याने हे पाहिलं नाही की ते कुठे जात आहे. अस्वल झाडाच्या ऐवजी कोरड्या पडलेल्या विहिरीजवळ गेले आणि धपकन त्यात पडले. ऐन मोक्याच्या वेळी जॅकने उडी मारून झाडाची फांदी पकडली.

“गर्रर्रर्रर्र!” तुम्ही इतका आरडाओरडा कधी ऐकला नसेल जितका त्या अस्वलाने विहिरीतून बाहेर पडण्याच्या प्रयत्नात केला. जेव्हा ते वर चढण्यासाठी विहिरीच्या दगडाला धरत असे, तेव्हा दगड तुटून बाहेर येत आणि अस्वल परत खाली पडत असे.



हो महाराज, जॅकला आत्तापासूनच त्याच्या खिशात अधिकचे शंभर डॉलर आहेत असे वाटू लागले.

“तर शेरिफ,” जॅकने शहरात परत येवून म्हटले, “मला कोणताही भयंकर अस्वल भेटले नाही, पण रडणारे लहान अस्वल भेटले. मी थोडावेळ त्याच्याशी खेळलो पण ते मला झोपू देईना. मग मी त्याला कोरड्या विहिरीत ढकलून दिले.”

“निर्भीड जॅक,तू तर खूपच विशेष आहेस रे, विहिरीत पडलेलं अस्वल बघून शेरिफ म्हणाला. मग त्याने जॅकला पैसे दिले. “तू जर अजून एका जंगली जानवरा पासून आमची सुटका केली तर मी खरोखरच तुझे आभार मानेल.”

“किती आभारी राहाल?”

“तीनशे डॉलर.”

जॅकने तोंडाने शिट्टी वाजवली. “खूपच दुष्ट प्राणी असेल.”


“तुला अंदाजसुद्धा येणार नाही.” शेरिफ म्हणाले. “तुझ्या लक्षात आहे का तू प्रथम शहरात आला तेव्हा तुझ्या मागे कोण आलं होतं? तो एक जंगली युनिकॉर्न होता, ज्याने तुला जवळजवळ कुद्डलेच होते.”

“तुम्ही वाढवून चढवून बोलत आहात.”

“नाही, त्या बदमाश यूनिकॉर्नने जवळजवळ शंभर गायींना शिंगांनी मारले आणि तितक्याच मेंढ्या आणि दोन तीन वृद्ध महिलांना सुद्धा.

“ठीक आहे, मी बघतो मला काही करता येतं का? जॅक म्हणाला. “पण त्यासाठी तुम्हांला पाचशे डॉलर रोख द्यावे लागतील.”


“मला वाटतं आमच्यासाठी हा स्वस्त सौदा होईल,” शेरिफ होकार देत म्हणाले.



जॅकने यूनिकॉर्नच्या बाबत ऐकलं होतं. परंतु त्याचा युनिकॉर्नशी कधी सामना झाला नव्हता. त्याला हे माहित होतं की आत्ता युनिकॉर्नशी ओळख वाढवण्याची ही वेळ नाही. जॅक शहरातून निघून आपल्या रस्त्याला लागला.


जॅक अधिक दूर गेला नाही तर त्याला भयंकर दुर्गंधी येवू लागली. सुरुवातीला त्याच्या लक्षात आलं नाही. “इथं तर एकही मांजर नाही, सडलेली अंडी नाहीत. तीन दिवसाचे शिळे मासे नाहीत.”





तोपर्यंत जॅकच्या लक्षात आलं की त्याने असा सडलेला दुर्गंध आधी कधी घेतला होता. खूप वेळ झाला होता. त्याच्या समोर रस्त्यावर जंगली युनिकॉर्न उभा होता. तो जमिनीला खुरांनी खरडत होता आणि त्याच्या श्वासातून घाण वास येत होता. त्याने जॅककडे वटारून पाहिले. त्याने आपले शिंग जॅकवर रोखले आणि त्याच्यामागे धावला.


जिथं चालत जाणे शक्य असे तिथं जॅक कधीही पळत जात नसे. पण जर कधी त्याला पळण्याची वेळ आली तर तो खूप वेगाने धावत असे. तसा तो धावला.पण जंगली यूनिकॉर्न बिलकुल त्याच्या मागे होता.




जॅक आणि युनिकॉर्न पळत शहराच्या मधोमध आले आणि न्यायालयाच्या चारी बाजूला पळू लागले.

“चिंता करू नको, निर्भीड जॅक, मी तुला वाचवेन.” आपली बंदुक उचलून शेरिफ म्हणाले.

तुम्हांला शंका आली असेल, शेरिफचा निशाणा बरोबर लागणार नाही. त्याने ट्रिगर दाबला आणि पहिली गोळी दूर आकाशात पोहचली. त्याने परत निशाणा लावला आणि गोळी चालवली ती ही जमिनीकडे, ती मातीत घुसली. पुढची गोळी चर्चच्या घंटेला लागली, त्यानंतरची गोळी एका खांबाला धडकली आणि एक वेळ फिरून सरळ युनिकॉर्नच्या मागच्या बाजूला लागली.





आता पर्यंत यूनिकॉर्नने जॅकला पळवून पळवून थकवलं होतं. तो जॅकला शिंग मारणारच होता, तेवढ्यात त्याच्या मागच्या बाजूला गोळी लागली. त्याचं लक्ष्य चुकलं आणि त्याचे शिंग पूर्णपणे झाडाच्या एका मोठ्या फांदीत घुसले.

ते जंगली यूनिकॉर्न एवढ्या जोरात ओरडले की पहाडाच्या एका बाजूचा कडा आणि दगड घसरून खाली पडू लागले. पण खूप प्रयत्न केल्या नंतरही ते शिंग बाहेर काढू शकले नाही. शेवटी,एवढी झटापट केल्याने त्याचे शिंग तुटले आणि यूनिकॉर्न-जो शिंगाचा प्राणी होता तो आता मार खालेल्या अवस्थेत शहरातून दूर पळत होता.



"अरे हे तू काय केलंस," जॅकने शेरिफला म्हटलं, "तुम्हांला महित नाही का कि यूनिकॉर्न तितकेच दुर्लभ आहेत जितके कोंबड्यांचे दात? सगळ्या जगात काही मोजकेच युनिकॉर्न आहेत. जर मला वाटलं असतं तर मी त्याला जंगलातच मारलं असतं. पण मला त्याच्या बरोबर एका सर्कस मध्ये भाग घ्यायचा होता. मी त्याला इतकं थकवलं असतं की त्याच्यावर बसू शकलो असतो. पण तुम्ही गोळ्या मारल्याने फार गडबड झाली.

"मला फार वाईट वाटते,मला क्षमा कर, निर्भीड जॅक," शेरिफ म्हणाला..

"माझी नुकसान भरपाई करण्यासाठी तुम्हांला आता दुप्पट पैसे द्यावे लागतील."

शैरिफने एक मिनट विचार केला, "मला वाटतं की मी एवढं नक्कीच करू शकतो."

जॅकने एक हज़ार डॉलर घेतले आणि निघाला. तो आता किती धनवान आहे हे आईला दाखवण्यासाठी तो खूप उतावीळ झाला होता.



जसा जॅक जाऊ लागला तसा शेरिफ ओरडून म्हणाला, “हे,निर्भीड जॅक! मला वाटतं की पहाडांच्या त्या बाजूला राहणाऱ्या राक्षसाला तुझ्या सारख्या मुलाने घाबरण्याची आवश्यकता नाही.



“राक्षस!” जॅकने विचारलं.